# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५ E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com


गो.वि./म.वि / 25/21 दिनांक: 15/06/21

## परीपत्रक

(स्मरणपत्र)

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय :— दिनांक २४/१०/१९९२ ते ०३/०४/२००० या कालावधीमध्ये व त्यानंतर एम. फिल. या शैक्षणिक अर्हता प्राप्त अध्यापकांच्या संदर्भात नियुक्ती, पदोन्नती (कॅस) वेतनवाढीबाबतची माहीती प्रपत्रात भरुन त्वरीत सादर करण्याबाबत

संदर्भ :—१) विद्यापीठाचे पत्र क्रमांक गों. वि./ म. वि./१९६५/२०२१ दिनांक २६/०३/२०२१
२) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपुर विभाग, नागपुर यांचे पत्र क्रमांक /उशिनाग/वे. नि.शिक्षक/एम. फील लाभ/१५५३/२०२१ दिनांक १०/०३/२०२१
३)सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, नागपुर यांचे पत्र क्रमांक सआसकना/सकान/परीपत्रक /१०२६/२०२०—२१/नागपुर दिनांक १७/०३/२०२१
४) उशिसं/२०२१/नेट सेट न्या. प्र./ औवि/विशि/२८३७ दिनांक ०५/०३/२०२१

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते की, मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपुर विभाग, नागपुर यांच्या कार्यालयाकडुन पत्र निर्गमित करण्यात आलेले असुन सदर पत्रानुसार दिनांक २४/१०/१९९२ ते ०३/०४/२००० या कालावधीमध्ये व त्यानंतर एम. फील. या शैक्षणिक अर्हतेवर नियुक्त झालेल्या बिगर नेट/ सेट अध्यापकांना अनुज्ञेय नसतांना चुकीच्या पध्दतीने कॅस चे लाभ दिलेले आहेत. अशा सर्व अध्यापकांचे लाभ काढुन घेण्यात यावे व त्यांची सुधारीत वेतननिश्चिती करण्यात यावी याबाबतचे आदेश संदर्भिय पत्रामध्ये नमुद करण्यात आलेले आहे. तसेच दिनांक १४/०६/२००६ ते दिनांक ११/०७/२००९ या कालावधीत एम. फील. अर्हतेवर नविन नियुक्ती करण्यात आलेल्या अध्यापकांना यामधुन वगळण्यात आलेले आहे.

करीता उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील एम. फील. अर्हता धारण करुन कॅस चे लाभ घेण्यात आलेल्या अध्यापकांबाबत संदर्भिय पत्रास अनुसरुन प्राचार्यांनी त्वरीत कार्यवाही घ्यावी.वरील संदर्भिय पत्रानुसार कार्यवाही न केल्यास सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची राहील तसेच कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल विद्यापीठात त्वरीत सादर करावा.

वरील पत्राच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयांतील कॅस अंतर्गत लाभ घेतलेले कार्यरत अध्यापक, सेवानिवृत्त, बदली झालेले, धारणाधिकारावर गेलेले, राजीनामा दिलेले व ईतर कारणाने नौकरी सोडुन गेलेले सर्व अध्यापकांची सोबत संलग्नित केलेल्या प्रपत्रात अचुक माहिती भरुन दिनांक ३१/०३/२०२१ पर्यंत सादर करण्याबाबत विद्यापीठाचे संदर्भ क्रमांक १ च्या पत्रानुसार यापुर्वी सुचित करण्यात आले होते.

परंतु बऱ्याच प्राचार्यांनी याबाबत विद्यापीठाच्या प्रपत्रात भरुन माहीती सादर केलेली नाही. करीता सदर परीपत्रकाव्दारे आपणांस पुनश्चः सुचित करण्यात येते कि, सदर बाबतची माहीती प्रपत्रात भरुन दिनांक २५/०६/२०२१ पर्यत महाविद्यालयीन विभागाच्या **arcollegesectiongug48@gmail.com** या मेल आय—डी वर **Excel file** मध्ये सादर करावे. तसेच **Hard Copy** विद्यापीठात त्वरीत सादर करावे. ज्या महाविद्यालयांत दिनांक २४/१०/१९९२ ते ०३/०४/२००० या कालावधीमध्ये व त्यानंतर एम. फिल. या शैक्षणिक अर्हता प्राप्त अध्यापकांच्या संदर्भात नियुक्ती अथवा पदोन्नती (कॅस) झालेली नसेल अशा महाविद्यालयांनी सदर माहीती निरंक म्हणुन सादर करणे अनिवार्य राहील. चुकिची माहिती सादर केल्यास सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची राहील, करीता नोंद घ्यावी.

मा. कुलगुरु यांच्या आदेशानुसार

( डॉ. जी. डी. दुबे )
प्र.उपकुलसचिव(म.वि)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र संलंग्नित :— उपरोक्तप्रमाणे

दिनांक २४/१०/१९९२ ते ०३/०४/२००० या कालावधीमध्ये व त्यानंतर एम. फील. या शैक्षणिक अर्हता प्राप्त अध्यापकांच्या संदर्भात नियुक्ती, पदोन्नती (कॅस) तसेच वेतनवाढीबाबतची माहीती सादर करण्याबाबत

| अ. क्र | महाविद्यालयाचे नाव | प्राध्यापकाचे नाव | विषय | शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर/एम. फील./ पीएच. डी./नेट/सेट ) | शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेली दिनांक | नियुक्ती दिनांक | स्टेज –१ ते २ ( लेवल १० ते ११) दिनांक | स्टेज–२ ते ३ ( लेवल ११ ते १२ ) दिनांक | स्टेज– ३ ते ४ (सहयोगी प्राध्यापक ) लेवल १२ ते १३ A दिनांक | स्टेज–४ ते ५ ( प्राध्यापक ) लेवल १३ A ते १४ दिनांक | कॅस अंतर्गत लाभ घेतलेले अध्यापक कार्यरत, सेवानिवृत्त, बदली झालेले, धारणाधिकारावर गेलेले, राजीनामा दिलेले व ईतर कारणाने नौकरी सोडुन गेलेले |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

प्राचार्य स्वाक्षरी

महाराष्ट्र शासन
सहसंचालक उच्च शिक्षण नागपूर विभाग नागपूर.
जूने मॉरीस कॉलेज ईमारत परीसर सिताबर्डी,नागपूर.
(दुरध्वनी क्र२५६१७१३ फॅक्स क्र०७१२-२५५४२१० )
Website.www.dirhe.org.in/jdnagpur Email- jdhengp@rediffmail.com.

क्रमांकःउशिनाग/वे.नि.शिक्षक/एम.फिल लाभ/ ५५५३ /२०२१ दिनांक :- १० /०३/२०२१

**परिपत्रक/तात्काळ**

प्रति,

सर्व प्राचार्य,
अशासकीय कला,वाणिज्य,विज्ञान,विधी व अध्यापक महाविद्यालये,
नागपूर विभाग,नागपूर

**विषय : दि. २४.१०.१९९२ ते ०३.०४.२००० या कालावधीमध्ये व त्यानंतर एम.फिल. या शैक्षणिक अर्हता प्राप्त अध्यापकांच्या संदर्भात नियुक्ती, पदोन्नती (कॅस) तसेच वेतनवाढीबाबत.**

संदर्भ : १. शासनाचे क्रमांक संकीर्ण -२०२१/प्र.क्रं.४५/२१/विशि-१, दिनांक ३.०३.२०२१ चे पत्र
२. शासनाचे पत्र क्रं. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.०७/२१/विशि-१ दि. २७.०१.२०२१
३. संचालनालयाचे पत्र क्रं.उशि/२०२१/नेटसेट न्या.प्र./औवि/विशि./२८३७, दिनांक ०५.०३.२०२१

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १९.०९.१९९१ च्या अधिसुचनेनुसार अकृषि विद्यापीठे व महाविद्यालयामध्ये अधिव्याख्याता म्हणून नियुक्त होण्यासाठी नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण असणे ही शैक्षणिक अर्हता अनिवार्य आहे.

२. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. १४.०६.२००६ च्या एम.फिल संदर्भातील तरतुदी या केवळ दि. १४.०६.२००६ वा त्यानंतर नियुक्त होणा-या उमेदवारांना लागु होतील व या तरतुदी विद्यापीठ अनुदान आयोगाने पुढील आदेशापर्यंत लागु राहतील असे शासनास कळविले आहे. त्यामुळे दि. १४.०६.२००६ पुर्वी नियुक्त/कार्यरत अधिव्याख्यातांना सदरच्या तरतुदी लागु होत नाही. तसेच त्यांना एम.फिल च्या अर्हतेवर नेट/सेट मधून सुट मिळणार नाही.

३. अधिव्याख्याता म्हणून नियुक्त होण्यासाठी नेट/सेट ही अर्हता विद्यापीठ अनुदान आयोग तसेच शासनाने बंधनकारक केली आहे. अशी अर्हता धारण न करणा-या बिगर नेट/सेट अध्यापकांना कॅस चे लाभ अनुज्ञेय नाही. एम.फिल ही अर्हता केवळ दि. १४.०६.२००६ ते ११.०७.२००९ या दरम्यान नियुक्त होणा-या उमेदवारांना लागु आहे. पूर्वीच्या अध्यापकांना लागु नाही.

४. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्रं. ७५०२/२०२० दाखल झालेली असून दि. २७.०१.२०२१ च्या पत्रान्वये शासनाने अशा एम.फिल अर्हताधारक प्राध्यापकांचे लाभ काढून घेण्या संदर्भात आवश्यक कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

५. सदर सूचनेनुसार ज्या महाविद्यालयानी बिगर नेट/सेट अधिव्याख्यात्यांना एम.फिल अर्हता गृहित धरुन चुकीच्या पध्दतीने कॅसचे लाभ दिलेले आहेत ते लाभ काढुन त्यांची सुधारीत वेतननिश्चिती करुन घ्यावी. त्यानुसार सर्व महाविद्यालयानी तात्काळ कार्यवाही करावी.

(डॉ. संजय ठाकरे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर

**प्रतिलिपीः** कुलसचिव, सर्व विद्यापीठे, नागपूर, रामटेक,गडचिरोली. यांना माहिती व योग्य कार्यवाहीस्तव.

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

**सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसमोर,श्रध्दानंदपेठ, नागपूर-२२

दुरध्वनी / फॅक्स क्र.०७१२-२२२१०४१, ई-मेल-sdswo.nagpur@gmail.com


जाक्र.सआसकना/सकाम/परिपत्रक/ 1026. /२०२०-२१/नागपूर दिनांक :- 17/03/2021.

## परिपत्रक/तात्काळ

प्रति,

प्राचार्य,
सर्व समाजकार्य महाविद्यालय,

-------------------------------------------

**विषय:- मा. उच्च न्यायालय मुंबई, याचिका (लॉजिंग) क्र. ७५०२/२०२० श्री बी. एम. शिक्रे व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर.**

**संदर्भ:- १) मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन संकीर्ण-२०२१/प्र.क्र. ०७/२०/विशि-१ दि. २७.०१.२०२१**
**२) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण नागपूर विभाग, नागपूर यांचे परिपत्र क्र. उशिनाग/ वे.नि.शिक्षक/एफ. फिल लाभ/१५५३ दिनांक १०.०३.२०२१**

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाकिंत पत्रान्वये देण्यात आलेल्या सुचनानूसार सर्व समाजकार्य महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, संदर्भिय शासन पत्रान्वये याचिकाकर्ते यांनी याचिकासोबत जोडलेली व माहितीच्या अधिकाराअंर्तत प्राप्त झालेल्या माहितीचे अवलोकन करता शासनाने खालील प्रमाणे सूचना दिलेल्या आहेत.

१. विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या दिनांक १४.०६.२००६ च्या अधिसूचनेनूसार अधिव्याख्याता म्हणून नियुक्त होण्यासाठी नेट/सेट शैक्षणिक अर्हता अनिवार्य केलेली आहे. मात्र जर उमेदवाराने Mphil पदवी धारण केलेली असल्यास त्यांना नेट/सेट मधून सुट राहील अशी तरतुद केलेली आहे. सदरहु तरतुदी विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. ०१.०६.२००९ च्या अधिसूचनेनुसार सुधारित करुन Mphil अर्हता काढून टाकली नेट/सेट शैक्षणिक अर्हता अनिवार्य केलेली आहे. या तरतुदी राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून लागू होतील. सदरहू अधिसूचना केंद्रशासनाच्या दिनांक ११.०७.२००९ च्या राजपत्रात प्रसिध्द झालेली आहे.

२. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १४.०६.२००६ च्या अधिसूचनेतील तरतुदी या केवळ दिनांक १४.०६.२००६ वा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना लागु होतील व या तरतुदी पुढील आदेशापर्यंत राहील असे दिनांक १४.०२.२००९ च्या आदेशान्वये राज्यशासनास कळविलेले आहे . यावरुन स्पष्ट होते की, दिनांक १४.०६.२००६ पुर्वी नियुक्त/कार्यरत अधिव्याख्यातांना सदरहु तरतुदी लागु होत नाहीत. तसेच त्यांना Mphil च्या अर्हतेवर नेट/सेट मधुन सुट मिळणार नाही.

३. मात्र विभागीय सहसंचालक कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, पुणे, जळगांव, नांदेड, अमरावती, यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १४.०६.२००६ च्या तरतुदीचा चुकीचा अर्थ काढून १४.०६.२००६ पुर्वी नियुक्त बिगर नेट अध्यापकांना/प्राध्यापकांना त्यांनी एम. फिल पदवी प्राप्त केल्याच्या दिनांकापासून कॅश चे लाभ दिलेले आहे. अशाच प्रकारचे लाभ नागपूर व मुंबई येथे ही दिले असल्याची शक्यता असल्याचे नमुद आहे.

४. अधिव्याख्याता म्हणून नियुक्त होण्यासाठी नेट/सेट ही अर्हता बंधनकारक आहे. अशी अर्हता धारण न करणाऱ्या बिगर नेट/सेट अध्यापकांना कॅसचे लाभ अनुज्ञेय होत नाहीत. व एम. फील ही अर्हता केवळ दि. १४.०६.२००६ रोजी वा दि.

२१.०७.२००९ पुर्वी नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना लागू आहे. पूर्वीच्या अध्यापकांना सदर अर्हता लागू होत नाही, ही बाब संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना ज्ञात असतांना संबंधित सहसंचालकांनी अशा बिगर नेट/सेट अध्यापकांना एम. फील. अर्हता गृहित धरुन कॅसचे लाभ दिलेले आहे. संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी केलेली वरील कृती शासनाच्या धोरणास छेद देणारी असून शासन धोरणाची अवहेलना करणारी आहे. त्यांच्या या नियमबाहय कृतीमुळे शासनावर कोटयावधी रुपयांचा आर्थिक भूर्दंड पडलेला असण्याची शक्यता आहे. असे याद्वारे नमुद करण्यात आलेले आहे.

५. संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांची ही नियमबाहय कृती याचिका मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी क्र. २०८२/२०१३ मध्ये दि. २३.१२.२०१५ रोजी दिलेल्या निर्णयाचा अवमान करणारी तसेच याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असलेल्या प्रकरणांवर परिणाम करणारी ठरु शकते.

६. सदरहु माहिती दि. ०६.०७.२०१८ रोजी माहितीच्या अधिकारांतर्गत संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाने संबंधितांना उपलब्ध करुन दिलेली आहे. विभागीय सहसंचालकांनी बिगर नेट/सेट अधिव्याख्यातांना एम. फील अर्हता गृहित धरुन कॅसचे लाभ चूकीच्या पध्दतीने दिले गेले असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिलेली नाही, असे कळविण्यात आलेले आहे. याचिकेमध्ये विभागाअंतर्गत असलेले सर्व वरिष्ठ महाविद्यालये व अकृषी विद्यापीठाचा उल्लेख असल्याने यामध्ये सर्व समाजकार्य महाविद्यालये अंतर्भुत आहेत.

७. सबब अनुज्ञेय नसतांना बिगर नेट/सेट अधिव्याख्यात्यांना एम. फील अर्हता गृहित धरुन चूकीच्या पध्दतीने कॅसचे लाभ दिलेले आहेत अशा सर्व अधिव्याख्यात्यांचे लाभ काढून घेण्यात यावेत. असे निर्देश देण्यात आलेले आहे.

उपरोक्त बाबी संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, यांच्या बाबत असून उच्च शिक्षण विभागाची नियमावली व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचना महाविद्यालयीन शिक्षक कर्मचाऱ्यांना लागु होत असल्याने संदर्भिय शासन पत्रात नमुद केलेल्या निर्देशानुसार समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यास अशा प्रकारचे CAS चे लाभ दिल्या गेले असल्यास सदर नियमानुसार समाजकार्य महाविद्यालयातील अशा प्रकारे चुकीने दिल्या गेलेले लाभ तात्काळ प्रभावाने थांबविण्यात यावे. तसेच उपरोक्त प्रमाणे लाभ दिले असल्यास त्याची वसुली तात्काळ करण्याबाबत निर्देश या पत्राद्वारे देण्यात येत आहे.

(बाबासाहेब देशमुख)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, नागपूर

प्रतिलिपी:- 1) मा. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, म. रा. पुणे
2) मा. सहआयुक्त (शिक्षण) समाज कल्याण आयुक्तालय, म. रा. पुणे
३) मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, नागपूर

सही/-
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, नागपूर

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय

मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य पुणे-४११००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail :vidhi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३


क्र. उशिसं/२०२१/ नेटसेट न्या. प्र./औवि/विशि./2837 दि. ०५.०३.२०२१

05 MAR 2021

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.

**विषय :** दि. २४.१०.१९९२ ते ०३.०४.२००० या कालावधीमध्ये व त्यानंतर एम.फील. या शैक्षणिक अर्हता प्राप्त अध्यापकांच्या संदर्भात नियुक्ती, पदोन्नती (कॅस) तसेच वेतनवाढीबाबत.

संदर्भ : १. शासनाचे पत्र क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र. ४५/२१ विशि-१ दि. ०३.०३.२०२१
२. शासनाचे पत्र क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.०७/२०/ विशि-१ दि. २७.०१.२०२१

प्रस्तुत विषयात कळविण्यात येते की, आपल्या विभागांतर्गत असलेले सर्व वरिष्ट महाविद्यालये व अकृषी विद्यापीठांमध्ये MPhil शैक्षणिक अर्हतेवर दि. १४.०६.२००६ ते दि. ११.०७.२००९ या कालावधीतील नवीन नियुक्ती **वगळता** दि. २४.१०.१९९२ ते ०३.०४.२००० व त्यानंतर MPhil अर्हतेवर नियुक्त झालेल्या बिगर NET /SET अधिव्याख्यात्यांना अनुज्ञेय नसतांना चुकीच्या पद्धतीने CAS चे लाभ दिलेले आहेत अशा सर्व अधिव्याख्यात्यांचे लाभ काढून घेण्यात यावेत तसेच या संदर्भात संबंधीत विभागीय सहसंचालक, उ.शि. यांनी त्यांच्या स्तरावर कशाच्या आधारे कार्यवाही केलेली आहे, याबाबत खुलासा घेऊन संचालनालयाचे अभिप्रायासह प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत संदर्भीय दि. २७.०१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये शासनाने कळविले आहे. त्यानुसार सर्व विभागीय सहसंचालक, उ.शि. यांना संचालनालयाचे पत्र दि. १०.०२.२०२१ व सुधारित पत्र दि. ०५.०३.२०२१ व्दारे कळविण्यात आलेले आहे.

आता प्रस्तुत विषयात दि. २७.०१.२०२१ रोजीच्या शासन पत्रान्वये दिलेल्या सुचनानुसार कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल शासनास सादर करणेबाबत संदर्भीय पत्र दि. ०३.०३.२०२१ व्दारे शासनाने नव्याने सूचना दिलेली आहे. तरी प्रस्तुत विषयात शासनाने कळविल्यानुसार उचित कार्यवाही करण्यात यावी व त्यासंदर्भात अनुपालन अहवाल **दि. १५.०३.२०२१** पर्यंत **'न चुकता'** खाली नमुद केलेल्या ई-मेल वर संचालनालयास सादर करावा.

ई-मेल 1. vishi.dhepune@gov.in
2. anandadsule574@gmail.com

(सुयश दुसाने)
प्रशासन अधिकारी,
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य., पुणे - १.

सोबत :१. शासनाचे पत्र क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.०७/२०/ विशि-१ दि. २७.०१.२०२१
२. संचालनालयाचे पत्र दि. ०५.०३.२०२१
३. शासनाचे पत्र क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र. ४५/२१ विशि-१ दि. ०३.०३.२०२१